**पर्यटन धोरण, २०१६ अंतर्गत अतिविशाल पर्यटन प्रकल्पाचा (Ultra Mega Project Unit) दर्जा देण्याबाबत- महर्षी वेदोध्दारक फाऊंडेशन आणि महर्षी वैदिक हेल्थ प्रा.लि. यांच्या पर्यटन प्रकल्पाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : टीडीएस २०१७/७/प्र.क्र.७४०/पर्यटन,**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ मे, २०१९.

वाचा : १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- टिडीसी २०१५/११/प्र.क्र. १०२१/ पर्यटन, दिनांक ४.५.२०१६.
२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- टिडीसी २०१५/८/प्र.क्र. ९९२/पर्यटन, दिनांक ४.८.२०१७.
३) अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक- एचपीसी २०१७/सीआर १३५/उद्योग-८, दिनांक १५.३.२०१८.
४) भारत निवडणूक आयोग यांचे पत्र क्रमांक- ४३७MT-HP/२०१९/WS-II, दिनांक १४.५.२०१९

**प्रस्तावना :**

मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १४.२.२०१८ रोजीच्या बैठकीत महर्षी वेदोध्दारक फाऊंडेशन व महर्षी वैदिक हेल्थ प्रा.लि. यांच्या सेंटर फॉर हेल्थ या एकात्मिक प्रकल्पास मान्यता दिली. त्यास अनुसरुन उद्योग विभागाने संदर्भाधीन दिनांक १५.३.२०१८ च्या पत्रान्वये सदर प्रकल्पास देकार पत्र दिलेले असून, त्यान्वये पर्यटन विषयक बाबींसंदर्भात पर्यटन धोरण- २०१६ नुसार आवश्यक असल्यास पर्यटन विभागाने मान्यता पत्र निर्गमित करण्याबाबत कळविले.

शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- टिडीसी २०१५/११/प्र.क्र. १०२१/पर्यटन, दिनांक ४.५.२०१६ अन्वये महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ ला मान्यता देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ मध्ये परिच्छेद क्रमांक- ५.५ नुसार पात्र घटक देण्यात आलेले आहेत. परिच्छेद क्रमांक- ६ मध्ये आर्थिक प्रोत्साहन क्रमांक- ६.१.१ विशाल प्रकल्पाचे वर्गीकरण व त्यांचे निकष देण्यात आलेले आहेत. त्यानुसार अतिविशाल प्रकल्पासाठी संपूर्ण राज्याकरिता भारतीय रुपयांमधील स्थिर भांडवली गुंतवणूक- रुपये ५००.०० कोटी, प्रत्यक्ष रोजगार निर्मिती- ७५० व गुतवणूकीचा कालावधी- ८४ महिने, असे विहीत केलेले आहेत. पर्यटन धोरण २०१६ च्या परिच्छेद क्रमांक- ६ नुसार पर्यटन प्रकल्पांना Mega Project Unit व Ultra Mega Project म्हणून मान्यता देण्यासाठी, अधिक प्रोत्साहने/ सवलती मंजूर करण्यासाठी आणि अटी व शर्तींमध्ये सूट देण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

त्यानुसार महर्षी वेदोध्दारक फाऊंडेशन व महर्षी वैदिक हेल्थ प्रा.लि. यांच्या सेंटर फॉर हेल्थ या पर्यटन प्रकल्पास अतिविशाल प्रकल्प म्हणून मान्यता देण्याबाबत (Ultra Mega Project Unit) निर्णय घेण्यासाठी उच्चाधिकार समितीची दिनांक ६.३.२०१९ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत उच्चाधिकार समितीने, त्यानुसार महर्षी वेदोध्दारक फाऊंडेशन व महर्षी वैदिक हेल्थ प्रा.लि. यांच्या सेंटर फॉर हेल्थ या एकात्मिक प्रकल्पास महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ नुसार अतिविशाल प्रकल्प (Ultra Mega Project Unit) म्हणून मान्यता देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महर्षी वेदोध्दारक फाऊंडेशन व महर्षी वैदिक हेल्थ प्रा.लि. यांच्या सेंटर फॉर हेल्थ पर्यटन प्रकल्पास महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ नुसार

अतिविशाल प्रकल्पाचा (Ultra Mega Project Unit) दर्जा देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

महर्षी वेदोध्दारक फाऊंडेशन व महर्षी वैदिक हेल्थ प्रा.लि., मौजे वाडेश्वर/ वाहनगाव, ता.मावळ, जि.पुणे येथील १८० एकर जागेत हेल्थ फार्म, हॉटेल, थीम पार्क, जलक्रिडा इत्यादीसाठी सेंटर फॉर हेल्थ हा पर्यटन प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पात प्रस्तावित भांडवली गुंतवणूक अंदाजे रुपये १०००.०० कोटी (अक्षरी रुपये एक हजार कोटी मात्र) व ५००० व्यक्तींसाठी रोजगार निर्मिती होणार आहे. ही बाब विचारात घेता महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ नुसार हा प्रकल्प अतिविशाल प्रकल्पाचे (Ultra Mega Project Unit) निकष पूर्ण करित आहे. महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत स्थापन केलेल्या मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दिनांक ६.३.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णय विचारात घेऊन त्यानुसार महर्षी वेदोध्दारक फाऊंडेशन व महर्षी वैदिक हेल्थ प्रा.लि. यांच्या सेंटर फॉर हेल्थ या मौजे वाडेश्वर/ वाहनगाव, ता.मावळ, जि.पुणे येथील १८० एकर जागेत हेल्थ फार्म, हॉटेल, थीम पार्क, जलक्रिडा इत्यादी पर्यटन प्रकल्पास महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ नुसार अतिविशाल प्रकल्प (Ultra Mega Project Unit) म्हणून दर्जा देण्यास खालील अटींच्या अधिन राहून या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे :-

a) Department of Tourism or any office on its behalf to issue eligibility certificate which would enable the project proponent to purchase land without payment of Stamp Duty as per Notification of the Revenue and Forest Deptt, No. Mudrank 2016/436/UOR No. 07/CR 128/M-1, dated 11 January 2018.
b) The project proponent informed that they have already taken a stamp duty exemption as per the NOC letter issued by Maharashtra Tourism Development Corporation/ Tourism Directorate for Phase- I.
c) The project proponent would be enable for stamp duty exemption for next phase of the project under the Ultra-Mega project status as they have a Cabinet approval to be recognized as Ultra Mega Project under the new Tourism Policy- 2016.
d) The sanction of a fresh NOC to the proponent for stamp duty exemption for further purchase of land.
e) Implementing Agency for disbursement of all incentives of the Integrated Project will be Industry Department.

२. सदर प्रकल्पास मा.मंत्रिमंडळाने मंजूरी दिलेली असल्याने प्रकल्पाचे नियंत्रण, कार्यप्रवण व प्रकल्पाच्या अंमलबजावणीची देखरेख तसेच उद्योग व पर्यटन विभागाच्या धोरणानुसार अनुज्ञेय असलेली प्रोत्साहने (Incentives) उद्योग विभागाकडून प्रकल्पास अनुज्ञेय करण्यात यावीत.

३. महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत विहीत केलेले निकष अथवा अटी/ शर्ती/ नियम यांचा भंग झाल्यास वरील प्रकल्पास महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ नुसार अतिविशाल प्रकल्प (Ultra Mega Project Unit) म्हणून दिलेली मान्यता आपोआप रद्द होईल.

४. महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ नुसार अतिविशाल प्रकल्प (Ultra Mega Project Unit) म्हणून दिलेली मान्यता ही इतर कोणत्याही अधिनियम, नियमांतर्गत आवश्यक असलेल्या अनुज्ञप्त्या/ ना-हरकत प्रमाणपत्र/ परवानग्या इत्यादी मान्यतेस पर्याय नसेल.

५. सदर प्रकरणी लोकसभा निवडणूक २०१९ बाबत लागू करण्यात आलेल्या आदर्श निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन क्रमांक- ४ येथील दिनांक १४.५.२०१९ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०५२३१५२०४७१०२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Ramesh Jayaram Kadam
Date: 2019.05.23 15:26:52 +05'30'

**( र. ज. कदम )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद/ विधानसभा), महाराष्ट्र विधानमंडळ.
४. मा.मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव.
५. मा.राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव.
६. सर्व मा.विधानपरिषद सदस्य.
७. सर्व मा.विधानसभा सदस्य.
८. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव.
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग.
१०. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग.
११. प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग.
१२. प्रधान सचिव (उद्योग).
१३. प्रधान सचिव (ऊर्जा).
१४. प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम).
१५. प्रधान सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.
१६. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१७. आयुक्त, पुणे महानगरपालिका.
१८. जिल्हाधिकारी, पुणे.
१९. महालेखापाल, महाराष्ट्र १/ २ (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२०. सह सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.
२१. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
२३. महासंचालक, माहिती व जसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

२४. विक्रीकर/ वस्तु व सेवा कर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२५. उद्योग आयुक्त, उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२६. महर्षी वेदोध्दारक फाऊंडेशन व महर्षी वैदिक हेल्थ प्रा.लि.
२७. निवडनस्ती (पर्यटन).